लोकमत सिंधुदुर्ग, शुक्रवार, दि. १ जानेवारी २०१६

# हळबे महाविद्यालयात 'लेक लाडकी' अभियान

वैभव साळकर

दोडामार्ग : समाजात अपंगांबरोबरच अनेक दुर्बल घटक अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपल्या बरोबरच्या दुर्बल घटकांना पुढे घेऊन गेलो तरच आपला उत्कर्ष होईल, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका व हेल्पर्स ऑफ दी हँडिकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्षा नसिमा हुरजूक यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्यावतीने 'लेक लाडकी' अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी व त्यांच्या आई अर्थात मायलेकींच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मुलींनीच केले होते.

मान्यवरांच्या हस्ते उद्घाटनाचा




महिला उद्योजिका सुजल गवस यांचा सत्कार समाजसेविका नसिमा हुरजूक यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रम झाल्यानंतर यावेळी एकच कन्या प्राप्तीनंतर कुटुंब नियोजन करणाऱ्या तालुक्यातील माधुरी सावंत, वसुंधरा गवस, वैशाली गवस यांचा, स्वावलंबी अपंग संगीता राऊळ हिचा, कर्तबगार स्त्रिया माधवी मणेरकर, सुजला सूर्यकांत गवस तसेच युवती स्वयं निर्भर निधी अर्थात भाऊबीज निधी जास्त संकलन करणाऱ्या विद्यार्थिनी प्रज्ञा शिरोडकर, ज्योती जाधव व वरिष्ठ लिपिक किरण नाईक या सर्वांचा नसिमा हुरजूक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हुरजूक यांनी समाजातील अपंगत्वाचा ठसा मिटविण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. जेव्हा माणसाला खरी गरज असते, तेव्हा कोणीही मदत करीत नाही; पण जेव्हा गरज नसते तेव्हा हजारो हजारो हात पुढे येतात, असे सांगितले.

आपल्या संस्थेतील अनेक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितलेल्या अनेक आठवणींनी विद्यार्थ्यांना अश्रू आवरता आले नाहीत. त्यांनी वृद्धाश्रम काढण्याचे स्वप्न बोलून दाखविले. यावेळी त्यांच्या जीवन प्रवासावर व कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यानंतर त्यांनी नसिमा हुरजूक यांच्या हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेला विद्यार्थिनींनी जमा कलेल्या भाऊबीज निधीतून पाच हजार रुपयांचा धनादेश विद्यार्थिनींच्या हस्ते दिला. सुजल सूर्यकांत गवस यांनी दोन हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. प्राचार्यांच्या हस्ते नसिमा हुरजूक यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे स्थानिक सदस्य विवेकानंद नाईक, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख आर. एस. इंगळे, किरण नाईक तसेच सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी परीश्रम घेतले. किरण नाईक यांनी सूत्रसंचालन, तर पौर्णिमा वराडकर हिने आभार मानले.